शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष अकरावे : अंक तिसावा । एप्रिल-मे-जून २०२२

महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर संचलित

## न्यू कॉलेज, कोल्हापूर

Reaccredited By NAAC Grade 'A+'

# १९९० नंतरची मराठी कादंबरी



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष अकरावे : अंक तिसावा**

**एप्रिल–मे–जून २०२२**

## १९९० नंतरची मराठी कादंबरी

**• संपादक •**

नंदकुमार मोरे

**• संपादक मंडळ •**

एकनाथ पाटील । शामसुंदर मिरजकर । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**• अतिथी संपादक •**

**डॉ. व्ही. एम. पाटील**

प्राचार्य, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**गुंडोपंत पाटील**

मराठी विभाग प्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**• अतिथी संपादक मंडळ •**

अरुण शिंदे । दीपककुमार वळवी । सुजय पाटील । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**• प्रकाशक •**

**प्रकाश दुकळे**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी,

फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१०

**• मुद्रक •**

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर. फोन नं.: ०२३१–२६५४३२९

**मूल्य : ३००/–**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. प्रकाश दुकळे, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१० येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

३४. 'स्त्री' स्वातंत्र्याची अभिव्यक्ती करणारी सानियांची कादंबरी — डॉ. स्वप्निल बुचडे ............. १८४
३५. नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदनांच्या पडझडीचे प्रतिबिंब — प्रा. संतोषकुमार डफळापूरकर .... १८८
३६. नव्वदोत्तर स्त्रीवादी कादंबरी स्त्री जाणिवा — प्रा. संगिता वामन सूर्यवंशी....... १९२
३७. १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव — प्रा. रेखा काशिनाथ पसाले ...... १९६
३८. ग्रामीण कादंबरीकार : अनुराधा गुरव — प्रा. स्मिता कोंडीबा कालभूषण .. २००
३९. १९९० नंतरच्या स्त्री कादंबरीतील जाणिवा — प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे..... २०४
४०. 'अस्वस्थ नायक' व 'श्राद्ध' कादंबरीतील भाषा शैलीचा तौलनिक अभ्यास' — प्रा.सुजाता संजय चोपडे (इनामदार) २०८
४१. नव्वदोत्तरी कादंबरीचा आशय आणि स्वरुप — प्रा.डॉ.विजय अर्जुन रेवजे ......... २१२
४२. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — प्रा. जयवंत शं. सुतार ............. २१५
४३. १९९० नंतरची भटक्या-विमुक्तांची कादंबरी — सौ. विजयालक्ष्मी विजयदेवगोजी .. २२१
४४. एकोणीशे नवोदत्तरी मराठी कादंबरीची दशा आणि दिशा — प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक २२६
४५. 'नव्वदोत्तर मराठी कांदबरीतील समाजचित्रण' — डॉ. महावीर विठ्ठल कांबळे ...... २२८
४६. ११९० नंतरची महानगरीय कादंबरी — डॉ. मनीषा आझाद नायकवडी ... २३३
४७. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — लिंगप्पा गुळाळे.................. २३८
४८. नव्वदोत्तरी आदिवासी कादंबरीतील निसर्ग जाणिवा — प्रा. रघुनाथ चंदर गवळी ......... २४२
४९. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित मराठी कादंबरीमधील स्त्री जाणिवा — डॉ. राजश्री बंडोपंत पोवार ......... २४७
५०. नव्वदोत्तरी कालखंड आणि रंगनाथपठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व — प्रा. डॉ. प्रदीप पाटील ........... २५२
५१. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कांदबरी — प्रा. गणपत हनुमंत निमसे ........ २५८
५२. १९९० नंतरचे स्त्रियांचे कादंबरीलेखन — प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील २६२
५३. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील बेकारीचे चित्रण — अमोल सुभाष कवडे............. २६७
५४. नव्वदोत्तर मराठी कादंबरी : ग्राम आणि आदिवासी जीवन — अमोल चांदेकर.................. २७१
५५. १९९० नंतरच्या मराठी व हिंदी कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास — डॉ. भरत भीमराव जाधव ........ २७६
५६. 'नव्वदोत्तर आदिवासी कादंबरीतील स्त्रीजीवन' — डॉ. भीमराव खं. वानोळे ........ २८२
५७. १९९० नंतरची दलित कादंबरी — डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे........ २८७
५८. '१९९० नंतरची आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी' — प्रा. दत्तू मेंगाळ .................. २९२
५९. १९९० नंतरची मराठी कादंबरी-विविधतापूर्ण विपुल प्रवाहित्व — डॉ. युवराज देवाळे .............. २९९
६०. जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी — प्रा. मोहन चव्हाण ............... ३०३
६१. १९९० नंतरच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन आणि भाषिक विशेष — डॉ. प्रकाश दुकळे ............... ३०९
६२. हिंदी उपन्यास साहित्य में प्रतिबिंबित बदलते मूल्य — प्रा.डॉ.सौ.एस.के.पाटील ......... ३१४
६३. Post-1990 Marathi Novel and the Language Change — Prof.Kirti Suhas Kurane ३१८
६४. Reflection of 'Educational Qualification' in Post 1990's Novels — Prof. Anita Powar ..... ३२१
६५. Contribution of Women Novelists In writing Marathi Novels After 1990s — Mrs. Daya Prasad Patil. ३२५


ISSN No. 2319-6025

# १९९० नंतरची दलित कादंबरी

**डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे**
किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

**प्रस्तावना**

१९६० नंतरच्या काळात मराठी साहित्यविश्वात दलित साहित्याचा फार मोठा वाटा आहे. कविता, कथा, आत्मकथन, कादंबरी व नाटक या साहित्यप्रकारांच्या माध्यमातून दलित लेखक दलितांच्या व्यथा-वेदना मांडू लागला. अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या दलित लेखकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरणा मिळाली व तो विविध वाङ्मय प्रकारांमध्ये लेखन करू लागला.

दलित साहित्यात कविता, कथा, आत्मकथन, या प्रकारांमध्ये जेवढे लेखन झाले, त्या प्रमाणात कादंबरीलेखन झालेले दिसत नाही. सुरुवातीच्या काळात अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा. शेंडे इ. लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून दलितांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडण्याचे काम केले, परंतु त्यानंतर मात्र ही गती कमी झाल्याचे दिसून येते. १९९० नंतर जुन्या व नव्या पिढीतील अनेक दलित लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून दलितांच्याबदलत्या जीवनाचे चित्रण केलेले दिसून येते.

१९९० नंतर मराठी साहित्यविश्वात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले, जागतिकीकरणाचा परिणाम मराठी कादंबरी आणि पर्यायाने दलित कादंबरीवर देखील झालेला आहे.पारंपरिक पद्धतीने चालत आलेला दलित समाज परिवर्तनवादी दृष्टीकोन घेवून समोर येताना दिसतो. दलित राजकारणाचे बदलते स्वरूप, आरक्षण, दलित अन्यायाला वाचा फोडणारी दलित पॅन्थर यांचाही प्रभाव १९९० नंतरच्याच्या दलित कादंबरीवर पडला असल्याने, इतर कादंबरीपेक्षा या कालखंडातील दलित कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये १९९० नंतरच्या 'झुंड', 'चक्री', 'बहुजन', 'उपल्या', 'हिंदू', 'राघववेळ', 'कोंडी', 'रमाई मी सावित्री! मी यशोधरा!', 'अस्वस्थ नायक' या कादंबऱ्यांचा विचार करण्यात आला आहे.

**१९९० नंतरच्या दलित कादंबरीतील दलित राजकारण**

या कालखंडातील दलित कादंबरीचा आढावा घेत असताना त्यामध्ये दिसून येणारा महत्वाचा घटक म्हणजे दलित राजकारण, 'दृष्टचक्र', 'उपल्या' आणि 'घुसमट' या कादंबऱ्यांमधून दलित राजकारणाचे चित्रण आले आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाची वाताहात एकनाथ सोनावणे यांनी 'दृष्टचक्र' या कादंबरीत मांडली आहे. विभागलेले दलित पुढारी आणि त्यामुळे दलित राजकारणाची झालेली दुर्दशा याचे ज्वलंत चित्रण 'दृष्टचक्र' च्या माधमातून दिसून येते. बाबाचा रथ हाय इथे. त्याला पुढे नेणंभागच हाय. पर आता या चळवळीचं मातेरं व्हतय. कुत्र्याच्या छतावाणी घराघरात पुढारी जन्माला आलाय. प्रत्येकाने बाबाच्या नावचे चार-पाच भाग करून आपला झेंडा नाचवाय लागलेत. भोळ्या भाबड्या माणसानं कोणाच्या माग जाव, हेचकळत न्हाय बापू. (दृष्टचक्र पृ.क्र. १०६) गटा- गटामध्ये विभागलेले दलित राजकारण बापू पांगरीकर यांना आवडत नाही, कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संघटीत राजकारण

अपेक्षित होते. सामान्य दलितांची होणारी कोंडी बापूला अस्वस्थ करते व त्यातून तो आपली भूमिका मांडताना दिसतो. दलित राजकारणामुळे दलित समाजाची होणारी घुसमट भीमसेन देठे 'घुसमट' या कादंबरीत चित्रित करताना दिसतात. रिपब्लिकन पक्षाच्या पुढाऱ्याना कंटाळून 'दलित पँथर' च्या आक्रमकतेकडे वळलेला दलित समाज आणि त्यानंतर दलित पँथरमधील फूट याविषयीचे चित्रण 'घुसमट' मधून पहावयास मिळते.

## १९९० नंतरच्या दलित कादंबरीतील अस्पृश्यता

१९९० नंतरची दलित कादंबरीआणि त्या अगोदरची कादंबरी यांमध्ये साम्य असणारा घटक म्हणजे अस्पृश्यता.परंपरेने चालत आलेली अस्पृश्यता जागतिकीकरणानंतरही तिचा प्रभाव दलित साहित्यावर असल्याचे पहावयास मिळते. 'झुंड' या कादंबरीत डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी अस्पृश्यतेचे वर्णन केले आहे. कादंबरीचा नायक आनंद काशीकर जातीनेअस्पृश्य आहे. तो एकदा हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी गेला असता तेथे घडलेल्या प्रसंगाचे वर्णन डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे, रामकिशनने दलितांसाठी वेगळी ठेवलेली कपबशी घेतली. केशव काकडेने वरून चहा ओतला. केशव काकडेनं कस्तुरे आणि आनंदला चहा दिला, आनंदचं सगळं लक्ष रामकिशनवर केंद्रित झालं होतं ते काकडेच्या नजरेतून सुटल नव्हतं. काकडेनं स्वतःहून खुलासा केला. त्यांच्यासाठी वेगळी कपबशी ठेवली आहे, तसं चहा पियाला त्यांचे लोक कुणी येत नाहीत. एक दोन जणच येतात. आनंदला राहवलं नाही तो लगेच बोलला. त्याच्या बोलण्यात तिखटपणा होता.कायद्याने अस्पृश्यता नष्ट केली आहे. दलितांना बरोबरीची वागणूक दिली पाहिजे. (झुंड पृ.क्र ३४) मनुस्मृतीमध्ये संगितल्याप्रमाणे वाससि मृतचेलानी भिन्न भाश्देषु भोजनम म्हणजे अस्पृश्यांना फुटक्या भांड्यात जेवण द्यावे असा याचा अर्थ होतो. आज आपण जागतिकीकरणाच्या, आधुनिकतेच्या आविर्भावात वावरत असलो तरी, अस्पृश्यता वेगवेगळ्या रुपात जिवंत असल्याचे दिसून येते. अस्पृश्यतेची पाळेमुळे किती खोलवर रुजलेली आहेत, याचा प्रत्यय 'झुंड' च्या माधमातून डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी मांडला आहे. शिवाय गावातील यात्रेच्या निमित्ताने असणारे गावभोजन यामध्येदलित विद्यार्थी आणि अस्पृश समाज यांची शेवटची पंगत यासारख्या प्रसंगातून 'झुंड' कादंबरीमध्ये अस्पृश्यतेचे चित्रण दिसून येते.

शरणकुमार लिंबाळे यांच्या 'उपल्या' कादंबरीचा नायक अस्पृश्यता निवारणासाठी प्रयत्न करत असताना सवर्ण समाजातील मुले त्याला जयभीमवाला म्हणून, तर दलित समाजातील मुले बामन म्हणून हिणवतात, त्यामुळे दोन्हीकडून त्याची घुसमट होताना दिसते. तर 'झुंड' मध्ये असणारा डॉक्टरअस्पृश्य असल्याने त्याचा स्पर्श सवर्णांना सहन होत नाही, त्यामुळे तेत्याच्या बदलीचा प्रयत्न करताना दिसतात.

अशा प्रकारे अस्पृश्यतेचे चित्रण १९९० नंतरच्या दलित कादंबरीत येताना दिसते.

## आरक्षण

पिढ्यानपिढ्या दारिद्र्यात खितपत पडलेल्या दलित समाजाला सामाजिक आणि राजकीय न्याय मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षण मिळवून दिले. परंतु हे आरक्षण सवर्ण लोकांच्या पचनी पडले नाही, त्यामळे दलितांची प्रगतीत्यांच्या डोळ्यात खुपू लागली. याविषयीचे चित्रण १९९० नंतरच्या दलित कादंबरीतून दिसून येते. 'बहुजन' आणि 'हिंदू' या कादंबरीत शरणकुमार लिंबाळे यांनी दलितांचे आरक्षण याविषयी येणारे प्रसंग सांगितले आहेत.


ISSN No. 2319-6025

आरक्षणाला विरोध असणारा राघवेंद्र म्हणतो की आरक्षणाच्या जोरावर मागासवर्गीय पुढे जातील आणि बढतीच्या स्पर्धेत यशस्वी होतील. शिवाय त्याचा फायदा त्यांच्या पुढील पिढीला देखील होईल आणि ब्राम्हणांना मेलेली जनावरे ओढावी लागतील. (बहुजन पृ.क्र.११४)प्रस्तुत कादंबरीतून सवर्णांची आरक्षणविरोधी भूमिका मांडली आहे. तर 'हिंदू' कादंबरीमध्ये राजकीय आरक्षणामुळे संधी मिळालेला सदानंद कांबळे, सरपंच पदापासून ते आमदार आणि मंत्री पदापर्यंत पोहोचतो, असे असले तरी त्याचे राजकारणातील स्थान आणि अधिकार मात्र मर्यादित आणि नाममात्र असतात, तो फक्त सहीचा मालक असतो आणि सत्तेच्या चाव्या उच्चवर्णीयांच्या हातात असतात. 'हिंदू' कादंबरीच्या माध्यमातून डॉ. लिंबाळे यांनी दलित नेत्यांची दयनीय स्थिती मांडली आहे.अस्पृश्य समाजाला विविध क्षेत्रात आरक्षण असले, तरी त्याला त्याच्या पदाचा आणि अधिकाराचा वापर करता येतो का? हा प्रश्न याठिकाणी उपस्थित होतो.

**धर्मांतर**

समाजात वावरत असताना मिळणारी विषम वागणूक पाहून, अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या समाजालाडॉ.बाबासाहेव आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दिक्षा दिली आणि अस्पृश्य समाजाचे नवे अस्तित्व निर्माण होऊन हा समाज स्वाभिमानाणे जगू लागला. हजारो वर्षे गुलामगिरीत असलेल्या अस्पृश्य समजाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर करून नवीन दिशा दिली आणि एका नव्या क्रांतीला सुरुवात झाली.या बदलाचे चित्रण१९९० नंतरच्या दलित कादंबरीत येताना दिसते. बौद्ध धर्म स्विकारल्यानंतर अल्पावधीतच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले आणि त्यामुळे बौध्द धर्म स्वीकारलेला समाज पोरका झाला. याविषयीचे चित्रणभीमसेन देठे यांनी 'चक्री'या कादंबरीमधून येताना दिसते. दलितांनी हिंदू देवदेवता नाकारल्या आणि धर्मांतर केले त्यामुळे हिंदू धर्मियाकडून होणारा त्रास आणि त्यामुळे अडचणीत आलेला अस्पृश्य समाज याचे चित्रण डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी 'उपल्या' मधून केले आहे. धर्मांतरामुळे दलितांना नवं आत्मभानआलं दलितांनी हिंदू देवदेवता नाकारल्या, सवर्ण हिंदूची हीन कामे नाकारली, मृत जनावराचे मांस खाणे सोडून दिलं, मेलेली जनावरं ओढणं सोडून दिलं, आम्हीही माणसं आहोत, असे ते निर्भयपणे सांगू लागले. त्यामुळे गावोगावी पेच निर्माण झाला. आता शूद्रांची कामे कोण करणार? हिंदूनी दलितांवर सामाजिक बहिष्कार टाकला. दलितांचा छळ केला; पण धर्मांतराची लाट थांबली नाही.(उपल्या पृ.क्र.१२६) 'झुंड' या कादंबरीवर देखील धर्मांतराचा प्रभाव पडलेला दिसून येतो. धर्मांतरामुळे सर्वत्र बौध्द विहारे बांधण्यात आली आणि त्याठिकाणी धम्मवंदना घेण्यात येत असल्याचे वर्णन 'झुंड' मधून पाहायला मिळते. अस्पृश्यांनीधर्मांतर केले असले तरी आजही लोक आपल्या परंपरा सोडायला तयार नाहीत. आजही ग्रामीण भागात अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते याचे वर्णन डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी 'हिंदू' मध्ये पुढीलप्रमाणे केले आहे. दलितांनी बौद्ध धम्माचं अनुकरण सुरु केलं होतं. त्यांनी आपल्या घरातील हिंदूदेवता उकिरड्यावर फेकून दिल्या. घरातील हिंदू देवतांच्या मूर्ती जमिनीत गाडल्या होत्या. दलितांनी नवी श्रद्धा स्विकारली होती. नवी उपासना पद्धती स्विकारली होती. माझ्या घरी अजूनही हिंदू देवदेवता होत्या. लक्ष्मी चोरून त्यांची पूजा करायची. घरी एखादा कार्यकर्ता आला की ह्या मूर्ती चोरून ठेवाव्या लागत. हॉलमध्ये बाबासाहेब आणि बुध्द होते. किचनमध्ये हिंदू देवदेवता होत्या ('हिंदू' पृ.क्र. १४) यामधून डॉ. शरणकुमार लिंबाळे स्वतःच्या घरातील वास्तव परिस्थिती सांगून दलितांच्या जीवनातील

धर्माचे वास्तव सांगितले आहे. १९५६ साली दलितांनी धर्मांतर करून बौध्द धम्म स्वीकारला, परंतु धर्मांतरानंतरही दलित मानसिकता पूर्णपणे बदलली नाही. आपण धर्मांतर केले आहे, हे माहीत असूनही जुन्या चालीरीती सोडायला मन धजावत नव्हते. अशा कात्रीत सापडलेल्या दलित मानसिकतेचे वर्णन प्रस्तुत कादंबरीमधून येताना दिसते.

**दलित वस्ती**

पूर्वीपासून चालत आलेली महारवाडा, मांगवाडा, चांभारवाडा, ढोरवाडा या नावांऐवजी दलित वस्ती, हरिजन वस्ती चा उल्लेख १९९० नंतरच्या दलित कादंबरीत येताना दिसतो, गावकुसाबाहेर असणारा समाज गावात, शहरात प्रतिष्ठेने राहू लागला आणि त्यांच्या समूहाचे नामकरण 'दलित वस्ती' असे करण्यात आले. असे असले तरी या दलितवस्तीच्या विकासाच्या बाबतीत मात्र प्रगती दिसून येत नाही . बाबुराव बागुल यांच्या 'कोंडी' मध्ये दलित वस्तीचे चित्रण करणारा प्रसंग पुढीप्रमाणे.

मुलाला असे का घेतले ?
तीन-चार दिवसापासून तापलेय ?
वाहिनीला देखील बरे नाही वाटते?
ती देखील तापली आहे.
या घाणीवरल्या मच्छरामुळे.

या घाणीमुळेच काय? चाळीला येऊन भिडू लागलेल्या गर्दीमुळेही हवा येत नाही. जिकडे तिकडे घाण, हाणामाऱ्या, मन नेहमीच अस्वस्थ काळजीत, पाण्याचे हाल, संडास भरलेली, म्युन्सिपाल्टी ढुंकून बघत नाही. ('कोंडी'पृ.क्र. १०८) दलित वस्तीची निर्मिती झाली असली, तरी तिचा विकास मात्र कासव गतीने होताना दिसतो, घाणीचे साम्राज्य, मच्छर, लोकांची गर्दी आणि त्यामुळे धोक्यात आलेले आरोग्य याविषयीचे चित्रण बाबुराव बागुल यांनी'कोंडी' मधून केले आहे.

**१९९० नंतरच्या दलित कादंबरीतील दलित स्त्री**

पारंपरिक भारतीय समाजाने स्त्रीला बंदिस्त करून तिच्यावर अनिष्ठ निर्बंध लादले होते. तिला अनेक सुखांपासून वंचित ठेवले होते. अनिष्टरूढी, प्रथा, परंपराच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मोलाचे कार्य केलेत्यांच्या कार्याचा स्त्री शिक्षणावरील परिणाम १९९० नंतरच्या दलित कादंबरीवर दिसून येतो.'उपल्या' कादंबरीमधून स्त्री पुनर्विवाहाचे चित्रण डॉ.शरणकुमार लिंबाळे यांनी केले आहे तर डॉ.यशवंत मनोहर यांच्या 'रमाई मी सावित्री ! मी यशोधरा!' या कादंबरीत स्त्रीशिक्षणाचे चित्रण आले आहे. तसेच नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' मध्ये मुलांच्या शिक्षणाचे गांभीर्य असणारी वालंबी ही व्यक्तिरेखा येताना दिसते. वालंबी अत्यंत गरीब आहे, आपला मुलगा आजारी असताना पैसे नसल्याने दवाखान्यात नेऊ शकत नाही, अर्धपोटी राहून प्रसंगी पाण्यावर दिवस काढते. मात्र आपला मुलगा रघूला शिक्षणापासून दूर करत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिक्षणविषयक विचारधारा, शिक्षणापासून दूर असणाऱ्या मातंग समाजाला प्रेरणादायी ठरते आणि ती जबाबदारी नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ' मधून पार पाडली आहे. 'राघववेळ' मधील वालंबी इतर स्त्रियांसारखी कोणत्याही आमिषाला बळी पडत नाही.

**शिक्षणव्यवस्था**

शिक्षणाचे खाजगीकरण आणि त्यातून उदयास आलेली डोनेशन संस्कृती याविषयीचे वास्तव


ISSN No. 2319-6025

चित्रण उत्तम कांबळे यांची 'अस्वस्थ नायक' ही कादंबरी करते. थोड्या गुणांनी हुकलेला डी. एड चा प्रवेश आणि त्यासाठी जमीन विकून डोनेशन भरून प्रवेश घेणे, आणि नंतर प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन देखील नोकरीसाठी पुन्हा डोनेशनची केली जाणारी मागणी. त्यानंतर मटका अड्डा, धर्माच्या नावाखाली तीर्थ विकणे, दवाखाण्यात काम करणे, यासारख्याठिकाणी काम करावे लागणे अशा प्रसंगातून शिक्षणाची दुरावस्था आणि त्यातून निर्माण झालेली बेकारी याचे चित्रण 'अस्वस्थ नायक' मधून येताना दिसते. तसेच दलित वस्तीमधील शिक्षणाची स्थिती देखील यामधून दिसून येते. 'राघववेळ'मधीलराघू दोन वेळ पोटभर खाण्याची व्यवस्था नसतानाही शिक्षण घेतो, सुट्टीत मोलमजुरीचे काम करतो, आणि आईचा खर्चाचा भार कमी करतो. यामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित समाजात शिक्षणविषयक झालेली जागृती नामदेव कांबळे यांनी मांडली आहे.

**१९९० नंतरच्या दलित कादंबरीची भाषाशैली**

या कालखंडातील दलित कादंबरीच्या भाषेचा विचार करता ती प्रादेशिक वेगळेपण सिद्ध करताना दिसते. ग्रामीण दलित भाषेतील संवाद, विदर्भ मराठवाड्यामधील प्रादेशिक बोलींचा वापर, तात्त्विक विचार, वाक्प्रचार, म्हणी यांच्या वापरामुळे या कालखंडातील कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

**समारोप**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये १९९०नंतरच्या दलित कादंबरीचा आढावा घेण्यात आला आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव आणि आधुनिकता याचे दर्शन या कादंबऱ्यांमधून येताना दिसते. वेदना, विद्रोह, नकार, मानवता, विज्ञाननिष्ठा ही दलित साहित्याची आणि म्हणून दलित कादंबरीचीहीन वैशिष्ट्ये आहेत. असे असले तरी दलितांच्या परंपरेने चालत आलेल्या समस्या, त्यामध्ये नव्याने काही समस्यांची पडलेली भर आणि बदलते दलित जीवन याचा वेध या कालखंडातील कादंबरी घेते.

**संदर्भ**


१) सोनवणे एकनाथ, 'दृष्टचक्र', निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, २०१३,

२) लिंबाळे शरणकुमार, 'झुंड', दिलीपराज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००७

३) लिंबाळे शरणकुमार, 'बहुजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७,

४) लिंबाळे शरणकुमार, 'उपल्या', दिलीपराज प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००७,

५) लिंबाळे शरणकुमार, 'हिंदू', दिलीपराज प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००७,

६) बागुल बाबुराव, 'कोंडी', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०००

७) देठेभीमसेन, 'चक्री',संस्कृती प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००५,

८) नामदेव कांबळे, 'राघववेळ' देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि, तिसरी आवृत्ती, १९९६,

९) उत्तम कांबळे, 'अस्वस्थनायक' मनोविकास प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, २०१५